| | | |
|---|---|---|
| MHKO050027192023 | **म.सं.कौ.हि. का. क्र. ६४/२०२३ मधील नि.३० खालील आदेश** | **ज्योस्ना विनोद पाटील<br>वि.<br>विनोद नरसगोंडा पाटील** |

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिसाचारापासून महिलांचे संरक्षण, २००५ चे कलम २८(२) प्रमाणे व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल केला आहे.

**२.** अर्जदाराचे असे कथन आहे की,प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दि.१५/०३/२०२४ रोजी अंतरिम पोटगीचा अर्ज मंजूर झालेला आहे. वि.प. यांनी अर्जदार यांना दरमहा रू.३,०००/- प्रमाणे पोटगी व खर्चाकरिता रू.५०००/- देण्याचा आदेश पारीत केला आहे. वि.प. यांनी एक पै देखील रक्कम भरलेली नाही. त्यामुळे वि.प.ने न्यायालयाच्या आदेशाचा भंग, अवमान करीत आहे. याखेरीज संरक्षण आदेश देखील डावलून अर्जदार यांना नाहक त्रास देत आहेत. अशास्थीतीत वि.प. यांचा या कामातील बचाव रद्द होणे न्यायोचीत आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा.

**३.** प्रस्तुत अर्जास वि.प. यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही म्हणून खुलासा नाही असा आदेश पारीत करणेत येतो.

**४.** अर्जदाराचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने महिला कौटुंबिक हिंसाचारा कायदा अन्वये दाखल केला आहे. अर्जदार नं.१ व वि.प.नं.१ हे पती पत्नी आहेत याबाबत उभयंतामध्ये वाद नाहीत. अर्जदार क्र. १ ते ३ यांना दि.१५/०३/२०२४ रोजी दरमहा रू.३,०००/- अंतरिम पोटगी मंजूर झालेली आहे. तसेच खर्चाकरिता म्हणून रू.५,०००/- वि.प.ने देण्याचा आदेश झालेला आहे. वि.प. पैसे भरत नाही याकरिता अर्जदाराने कोणतेही स्टेप्स याकामी घेतलेली नाही. केवळ वि.प.चा बचाव रद्द करावा एवढाच अर्ज दिलेला आहे.

याव्यतिरिक्त अर्जदाराने पोटगीची रक्कम वसुल करण्याकरिता कोणत्याच मार्गाचा अवलंब केला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा मुदतपुर्व असल्यामुळे तो मंजूर होण्यास पात्र नाही. म्हणून मी खालील आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2025.12.20 11:10:49 +0530

**दिनांक– १९/१२/२०२५**
**इचलकरंजी.**

**(डी. बी. साठे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**